## प्रकरण चौथे

### शेती पाणी पुरवठ्याच्या सोयी व ऊस क्षेत्रातील बदल

पाण्याच्या नियमित व खात्रीलायक पुरवठा ऊस लागवडीतील एक आवश्यक घटक मानला जातो. तर कोणत्याही साखर कारखान्याला कारखान्याच्या गळित हंगामाला पुरेल इतका ताजा व नियमित ऊसाचा पुरवठा आवश्यक असतो. त्यामुळे कोणत्याही साखर कारखान्याला पाणी पुरवठयाच्या सोयीकडे विशेष लक्ष देणे जरुरीचे वाटते. ज्या भागात कालव्याच्या पाण्याच्या सोयी नसतील अशा भागात विहिरीच्या पाण्याचा प्रामुख्याने वापर केला जातो. परंतु दुष्काळी वर्षात
विहिरीच्या पाण्याचा प्रामुख्याने वापर केला जातो. परंतु दुष्काळी वर्षात
विहिरीमार्फत होणारा पाणी पुरवठा ऊस उत्पादनावर अनिष्ट परिणाम करतो. अशा परिस्थितीत उपलब्ध पाण्याचा योग्य वापर व्हावा यासाठी सभासदांना आर्थिक मदत देणे तसेच नवीन पाणी पुरवठा योजना यतयार करुन व त्या राबवून पाण्याची उपलब्धता वाढविण्याचा प्रयत्न केला जातो.

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना ज्या चंदगड तालुक्यात कार्यान्वित झाला आहे, त्या तालुक्यात ताम्रपर्णी व घटप्रभा या दोन महत्वाच्या नद्या आहेत. साहजिकच नदी काठावर वसलेल्या गावात ऊस उत्पादन होत असे व हा ऊस नजिकच्या एखाद्या कारखान्याला घातला जात असे. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना सुरु झाल्यावर कारखान्याला ऊसाचा पुरेसा व नियमित पुरवठा आवश्यक होता. त्यासाठी ऊसाखालील क्षेत्रात वाढ होण्याची गरज होती. नदीपासून लांब अंतरावर असलेल्या गावातील जमीन ऊसाखाली आल्यास ऊसाचे क्षेत्र वाढणार होते व कारखान्याला कार्यक्षेत्राबाहेरील ऊसावर अवलंबून राहण्याची गरजही कमी होणार होती. हे दोन्ही फायदे लक्षात घेऊन कारखान्याने पाणी पुरवठा योजना राबविण्यात पुढाकार घेतला.

पाणीपुरवठा योजनांचे स्वरुप[१]

पाणीपुरवठा योजनांमध्ये प्रवर्तकाची भूमिका साखर कारखान्याकडून केली जाते. म्हणजे साखर कारखाना पाणीपुरवठा योजनांच्यादृष्टीने आपल्या कार्यक्षेत्राचे सर्वेक्षण करतो. त्या सर्वेक्षणानंतर नियोजित योजना तयार केल्या जातात. योजनेचा संभाव्य खर्च ठरविला जातो या खर्चाला जिल्हा सहकारी बँकेकडून कर्ज मंजूर होईपर्यन्त योजनेचा खर्च साखर कारखाना करतो. कर्ज मंजुरीनंतर कर्जाची रक्कम कारखान्याकडे जमा होते. या योजनांना आवश्यक असणारा पाणी परवाना, वीज परवाना, इत्यादी तांत्रिक बाबींची पूर्तताही कारखान्यामार्फत केली जाते.

योजनेच्या एकूण खर्चापैकी १० टक्के रक्कम संबंधित योजनेत सहभागी होणाऱ्या सभासदांकडून उभारली जाते. संबंधित पाणी पुरवठा योजनेमुळे ओलिताखाली येणाऱ्या क्षेत्रातला कोणीही भू-धारक या योजनेत सहभागी होऊ शकतो. सभासदांसाठी प्रवेश शुल्क १ रुपया, २० रुपयांचा एक भाग व भाग धारण केल्यानंतर दर एकरी २५० रुपये अशी रक्कम वसूल केली जाते. योजनेच्या कार्यवाहीनंतर सभासदांना प्रत्येक वर्षासाठी प्रती एकराला १,६०० रुपये तर बिगर सभासदाला रु. २२०० पाणीकर द्यावा लागतो. या रकमेतून संबंधित योजनेसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड कारखान्यामार्फत केली जाते. कर्जाचे हप्ते कारखाना ठरवतो.

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याने
तयार केलेल्या पाणीपुरवठा योजना :

कारखान्याने कार्यक्षेत्रातील २५ गावांचे पाणीपुरवठा योजनेच्या दृष्टीने सर्वेक्षण केले. त्यातील १९ योजनांना शासनाची मंजुरी मिळाली. मात्र यातील ९ योजनांना पाणी परवाने मिळाले. १९८३ अखेर यातील ५ योजनांचा पाणीपुरवठा

----------

१. चेअरमन, पाणीपुरवठा योजना व दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, शेती विभागाकडून प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

कोष्टक १

## शेती पाणी पुरवठा योजना

(आकडे रुपयात)

| योजनेचे नाव | प्रकल्प खर्च | कमांड एरिया एकर | योजना सुरु | नदी | कर्जमंजूर रुपये | सभासद |
|---|---|---|---|---|---|---|
| १) श्री लक्ष्मी सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, कुरणी-बुझावडे, ता. चंदगड | १५,२९,२०० | ४७७ | १-४-१९८३ | घटप्रभा | १४,५१,००० | १६६ |
| २) श्री नागनाथ सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, नागरदळे, ता. चंदगड | ६,७७,४०० | १५० | १३-२-१९८३ | ताम्रपर्णी | ६,४३,००० | १६० |
| ३) श्री हनुमान सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, बोंजुर्डी, ता. चंदगड | ९,२९,१५० | १८० | ७-३-१९८३ | घटप्रभा | ८,८२,००० | १६९ |
| ४) श्री बसवेश्वर सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, राजगोळी खुर्द, ता. चंदगड | १३,३६,७३० | २६६ | ७-३-१९८३ | ताम्रपर्णी | १२,६९,००० | १६० |
| ५) श्री भावेश्वरी सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, पोरेवाडी, आसगोळी, ता. चंदगड | १७,१९,५०० 3142 6182080 | २५२ | १२-४-१९८३ | घटप्रभा | १३,७५,६०० | १५८ |
| ६) श्री विठ्ठल सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, कागणी ता. चंदगड | ५,३४,२०० | १५० | काम चालू आहे | ताम्रपर्णी | उपलब्ध नाही | १२० |
| ७) श्री लक्ष्मी सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, दाटे, ता. चंदगड | २०,३४,२०० | ४०० | | ताम्रपर्णी | -,,- | ४०१ |
| ८) शिरगाव सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, शिरगाव, ता. चंदगड | २७,१४,११० | ४५० | | ताम्रपर्णी | -,,- | ४७७ |
| ९) श्री रेणुका सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, कामेवाडी, ता. चंदगड | ९,७६,००० | ४०० | | ताम्रपर्णी | -,,- | उपलब्ध नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण : | १,२४,५०,५५० | २७२५ | १८११ |

61 8200

संदर्भ : शेती विभाग, दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना.

062,18,590

सुरू झाला. राहिलेल्या चार योजनांचे काम सुरू आहे. या योजनाबाबतचा तपशी
कोष्टक १ मध्ये दिला आहे.

या योजनांवरील अपेक्षित खर्च रु. १,२४,५०,५९० आहे. या योजनामुळे २७२५ एकर जमीन ओलिताखाली येईल. एकंदर १८११ सभासद या योजनांचा लाभ घेतील. प्रत्यक्षात यातील ५ योजना १९८५ अखेर पूर्ण झाल्याने १३२५ एकर जमीन ओलिताखाली आलेली आहे व ८१३ सभासदांना या योजनांचा लाभ मिळतो आहे. सर्व योजना नदीपासून साधारणपणे ४००० ते ७००० फूटावर आहेत. या योजनांमु कारखान्याचे कार्यक्षेत्रात ऊसाला पुरेसा पाणी पुरवठा होईल अशी अपेक्षा असण पाणी पुरवठयाच्या या योजना व कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस क्षेत्रात झाले बदल याचा विचार करता येईल.

ऊसाखालील क्षेत्रातील बदल :

कोणत्याही साखर कारखान्यामुळे कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊसाल नजीकची बाजारपेठ उपलब्ध होते. ऊसाला योग्य किंमती मिळू लागतात. त्यातच ऊसाच्या पिकासाठी आवश्यक असलेल्या पाणी पुरवठा सोयी उपलब्ध झाल्या त या सर्व घटकांमुळे ऊसाच्या उत्पादन वाढीची प्रेरणा निर्माण होते. या सर्वांतून लागवडी खालील क्षेत्रातही बदल होऊ लागतात. दौलत शेतकरी साखर कारखान्य कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊसाखालील क्षेत्रात झालेले बदल कोष्टक २ च्या आध अभ्यासता येतील.

कोष्टक २

कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस क्षेत्रात झालेले बदल

| तपशील | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) सभासदांचे एकूण ऊसक्षेत्र | १९०४.६० | २४५४.६२ | २१०३.८२ | २२६१.३८ | २४९७.६७ | २९०१.३२ | ३२४६.१८ | ३३५७.२३ |
| लागण | ८६५.६६ | ४६१.७१ | ४६७.२७ | ८८५.३२ | ७९०.०३ | ७०२.४१ | ७७५.३४ | ९८५.६२ |
| खोडवा | १०३८.९४ | १९९२.९१ | १६३६.५५ | १३७६.०६ | १७०७.६४ | २१९८.९१ | २४७०.८४ | २३७१.६१ |
| २) बिगर सभासदांचे एकूण ऊसक्षेत्र | ७८२.९६ | ८८३.२८ | ४१६.१८ | ६३४.५८ | ८६२.२० | १३८३.३८ | १३१७.२१ | ८५६.६० |
| लागण | ३५६.१० | १९८.८५ | १०३.३० | २०४.१० | ३५८.४६ | ४४७.७४ | ४१४.०० | २६६.९० |
| खोडवा | ४२६.८६ | ६८४.४३ | ३१२.८८ | ४३०.४८ | ५०३.७४ | ५०३.७४ | ९३५.६४ | ५८९.७० |
| एकूण ऊसक्षेत्र १ + २ | २६८७.५६ | ३३३७.९० | २५२०.०० | २८९५.९६ | ३३५९.८७ | ४२८४.७० | ४५६३.३९ | ४२१३.८३ |
| ३) कार्यक्षेत्रातील गांवे | २३१ | २३१ | २३१ | २३१ | २३१ | २२३ | २२३ | २२३ |
| कार्यक्षेत्रातील ऊस पुरविणारी गावे | १८७ | १८७ | १८९ | १९८ | २१० | २१० | २०९ | २०० |
| कार्यक्षेत्राबाहेरील ऊस पुरविणारी गावे | १०० | ७७ | ५१ | ६६ | ५८ | ६१ | ४४ | ४६ |

संदर्भ : शेती विभाग, दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, १९७७-७८ ते १९८४-८५ प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

या कोष्टकावरून असे दिसून येते की, कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील एकूण ऊस क्षेत्रात १९७७-७८ ते १९८४-८५ या कालावधीत १५२७.४८ हेक्टर वाढ झालेली आहे. ही वाढ खरोखरच लक्षणीय मानावी लागेल. या वाढीमुळे कार्यक्षेत्राबाहेरील ऊस पुरविण्याऱ्या गावांची संख्याही घटत चालली आहे. १९७९ ते १९८० या वर्षांचा अपवाद वगळल्यास कारखान्याच्या कार्यक्षेत्रात एकूण ऊस-क्षेत्रात सतत वाढ झालेली आहे.

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील उत्पादक सभासदांचे एकूण ऊस क्षेत्र वाढलेले आहेच पण बिगर सभासदांच्या एकूण ऊस क्षेत्रातही वाढ झालेली आहे. प्रकरण ३ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बिगर सभासदांचे वाढते ऊस क्षेत्र कारखान्याला उपलब्ध होणाऱ्या ऊसाच्या पुरवठ्यावर परिणाम करू शकेल.

परंतु ऊस क्षेत्रातील वाढीबरोबरच ऊसाचे उत्पादन वाढते आहे की नाही हा ही प्रश्न महत्वाचा आहे. ऊसाखालील क्षेत्राप्रमाणेच उत्पादनात सातत्याने वाढ झाल्यास कोणत्याही साखर कारखान्याला नियमित व पुरेसा ऊसाचा पुरवठा होऊ शकेल. एकूण ऊसाखालील क्षेत्र, ऊस क्षेत्रातील बदल व दर हेक्टरी उत्पादन याचा विचार कोष्टक ३ च्या आधारे करता येईल.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## कोष्टक ३

ऊस क्षेत्रातील व दर हेक्टरी उत्पादनातील बदल

(हेक्टरमध्ये)

| वर्ष | एकूण ऊसाखालील क्षेत्र | एकूण ऊस क्षेत्रातील बदल टक्के | दर हेक्टरी उत्पादन | दर हेक्टरी उत्पादनातील बदल टक्के |
|---|---|---|---|---|
| १९७७-७८ | २६८७.५६ | | ७१.१२ | |
| १९७८-७९ | ३३३८.१४ | २४.२५ | ६५.९५ | घट -७.२६ |
| १९७९-८० | २७९८.८० | घट-१६.१५ | ५८.६२ | घट -११.११ |
| १९८०-८१ | २८५६.४४ | २.०५ | ६२.८५ | ७.२१ |
| १९८१-८२ | ३४६४.९९ | २१.२८ | ७८.६२ | २५.०९ |
| १९८२-८३ | ४२८५.३४ | २३.६७ | ७०.९० | ९.८१ |
| १९८३-८४ | ४५५५.६२ | ६.३० | ४३.६७ | घट -३८.४० |
| १९८४-८५ | ४२१४.०६ | घट -७.४९ | ५९.९५ | ३७.२७ |

संदर्भ : शेती विभाग, दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, १९७७-७८ ते १९८४-८५ प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

या कोष्टकावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, केवळ ऊसक्षेत्रात वाढ झाल्याने कारखान्याला पुरेसा ऊस उपलब्ध होईलच असे नाही. ऊसक्षेत्रातील वाढीप्रमाणेच दर हेक्टरी उत्पादन वाढल्यास साखर कारखान्याला नियमित व पुरेसा ऊसाचा पुरवठा साखर कारखान्याला होऊ शकेल. या कोष्टकानुसार कारखान्याच्या पहिल्या गळित हंगामापासून ऊसाच्या दर हेक्टरी सरासरी उत्पादनात वाढीपेक्षा घटीची प्रवृत्ती जास्त वेळा दिसते आहे व याचा परिणाम कारखान्याच्या हंगाम दिवसांवर आणि एकंदर कामकाजावर होतो आहे. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात लागवडी खालील


क्षेत्र वाढूनही दर हेक्टरी उत्पादनात सातत्याने वाढ का होऊ शकली नाही याचा विचार करत असताना पाणी पुरवठ्याच्या सोयी हा एक महत्वाचा घटक आहे हे लक्षात घ्यावे लागेल. कारखान्याच्या पुढाकाराने सुरू झालेल्या ९ योजनां-पैकी ६ योजना ताम्रपर्णी नदीवर तर तीन योजना घटप्रभा नदीवर आहेत. या दोन नद्यांवर मोठी धरणे नाहीत मात्र या योजनांचा लाभ घेणाऱ्या सभासदांप्रमाणेच नदीच्या पाण्याचा वापर नदीकाठी जमीन असणारे ऊस उत्पादक खाजगीरित्या करत असतातच. चंदगड तालुक्यात ऊसाच्या लागवडी खालील क्षेत्रात झालेली वाढ ही प्रामुख्याने ताम्रपर्णी नदीच्या काठी झालेली आहे. परिणामी नदीच्या पाणी पुरवठ्याच्या क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात पाण्याचा उपसा वाढल्यामुळे ताम्रपर्णी नदीवर असलेल्या ऊसाला त्याचा तडाखा बसतो. मार्च व एप्रिल या दोन ऐन उन्हाळ्याच्या महिन्यात ऊसाला पुरेसे पाणी न मिळाल्याने त्याचा परिणाम ऊसाच्या दर्जावरही होतो.

ज्या साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात कालव्याच्या पाण्याच्या सोयी नाहीत त्या ठिकाणी ऊसाखालील क्षेत्रात होणाऱ्या वाढीबरोबर पुरेसा पाणी पुरवठा उपलब्ध करून देणाऱ्या योजना महत्वाच्या ठरतात. कारखान्याची गाळप-क्षमता वाढवित असताना या परिस्थितीकडे कारखान्याने जास्त काळजीपूर्वक पाहणे उपयुक्त ठरेल.

चंदगड तालुक्यातील जंगमहट्टी प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी पुरवठा उपलब्ध होईल व त्यामुळे कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊसाला पुरेसे पाणी मिळेल अशी अपेक्षा आहे. या प्रकल्पामुळे चंदगड तालुक्यातील २,५७० हेक्टर जमीन ओलिता खाली येईल.[२] व कारखान्याची कच्च्या मालाची समस्या सुटू शकेल.

-----------

२. कोल्हापूर जिल्हा, सामाजिक आर्थिक समालोचन, १९८३-८४.


चंदगड तालुका
जिल्हा कोल्हापूर
दौलत सहकारी साखर कारखान्याने कार्यान्वित केलेल्या पाणी पुरवठा योजना.
बांधकाम विभाग
जि. प. कोल्हापूर.
घटप्रभा नदी
घटप्रभा नदी
ताम्रपर्णी नदी
मार्कंडेय नदी
तिलारी नदी
मैल
सूची
तालुका सिमारेषा
नदी
कारखान्याचे ठिकाण
कार्यान्वित उपसा जलसिंचन योजना
काम चालू असलेल्या योजना.